# एकात्मीक बाल विकास सेवा योजना,
# महीला व बाल कल्याण विभाग

**योजनेचे उदिष्ट :**

- ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्य विषयक दर्जा सुधारणे .
- मुलांचा योग्य मानसीक, शारीरीक व सामाजीक विकासाचा पाया घालणे .
- बाल मृत्युचे प्रमाण ,बाल रोगाचे ,कुपोषणाचे व शाळा गळतीचे प्रमाण कमी करणे .
- मातांना पोषण आहार आणि आरोग्य शिक्षण देवून मुलांचे सर्वसाधारण आरोग्य आणि पोषण आहार या संबधीच्या गरजांची अधिक चांगली काळजी घेवू शकतील अश्या प्रकारे त्यांची क्षमता वाढविणे.
- बाल विकासात चालणा मिळावी म्हणून धोरण व अंमलबजावणी या बाबत विविध खात्या मध्ये प्रभावी समन्वय घडवून आणणे.

**एकात्मीक बाल विकास योजनेच्या सेवा :**

- पुरक पोषण आहार
- आरोग्य तपासणी
- रोग प्रतिबंधक (लसीकरण)
- संदर्भ सेवा
- आहार व आरोग्य शिक्षण .
- अनौपचारीक पुर्व प्राथमीक शिक्षण .

**महिला व बालकल्याण विभाग**

बाल कल्याण विभाग हा ग्रामिण भागात या जिल्हयातील एकुण २६८१ अंगणवाडी केन्द्गावर ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना पुरक पोषण आहार, उपचारशास्त्र मुलभुत आहार तसेच स्तनदा मातांना पुरक पोषण आहार पुरविणे तसेच कुपोषीत बालकांना संदर्भ सेवा देणे ग्रामिण भागातील गरोदर माता यांना पुरक पोषण आहार, आरोग्य तपासणी ३ ते ६ वयोगटातील मुलाना पुर्व शालेय शिक्षण देणे आणि किशोरवयीन मुलींना आहार, आरोग्य शिक्षण देणे ईत्यादी योजना राबविण्यात येतात . या विभागाचे खाते प्रमुख म्हणुन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) हे आहेत.

महिला व बाल कल्याण विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना.

**व्यवसायभिमुख शिक्षण घेणा-या महिला / मुलींना विद्यावेतन.**

फायद्याचे स्वरुप :-

आर्थिक दृष्टया मागास कुटूंबातील इयत्ता १० वी पास स्वतःचे पूर्नवसन करण्यासाठी दरमहा १००/- रु. विद्यावेतन शासनमान्य संस्थातुन उदा. पॅर्कींग, टेलीफोन ऑपरेटर ,टंखलेखन संगणक प्रशिक्षण, नर्सींग, आय.टी.आय. मध्ये प्रशिक्षण देणे.

पात्रतेच्या अटी :-

- प्रशिक्षणार्थी ज्या संस्थेमध्ये प्रक्षिशण घेत असेल त्या संस्थेकडे प्रशिक्षण वर्ग चालविण्याचा शासनाच्या संबंधात प्राधिकरणाचा परवाना आवश्यक आहे.
- प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षणासाठी निवडलेल्या अभ्यासक्रमास शासनाच्या संबंधित प्राधिकरणाची मान्यता आवश्यक आहे.
- प्रशिक्षणार्थीच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ३२०००/- पर्यंत असावे. तहसीलदार / तलाठी यांचा उत्पन्नाचा दाखला.
- प्रशिक्षणार्थीचे महाराष्ट्रातील वास्तव्य १५ वर्षापेक्षा कमी नसावे.
- प्रशिक्षणार्थीस इतर संस्था अगर व्यक्ती कडून विद्यावेतन मिळत असेल व ते या विद्यावेतनापेक्षा जास्त असेल तर हे विद्यावेतन मिळणार नाही व जर कमी असेल तर त्याऐवजी हे विद्यावेतन मिळेल.

**पुरक पोषण आहार योजना**

अंगणवाडीतील सर्व लाभार्थ्यांना लाभ दिल्या जातो.

**म.बा.क. समितीकरीता अनुदान**

समितीने ठरविलेल्या योजना राबविण्यात येतात.

**आदर्श अंगणवाडी सेविका पुरस्कार**

जिल्हयातील उत्कृष्ट काम करणाऱ्या सेविकेस रु. ५०००/- बक्षीस दिल्या जाते.

**महिला मेळावे**

जिल्हास्तर, प्रकल्प स्तर तसेच अंगणवाडी स्तरावर विविध मेळावे घेण्यात येतात.

**महिला समुपदेशन केंद्र**

फायद्याचे स्वरुप :-

- कुटूंबातील मारहान,लैगीक छळ व इतर त-हेने त्रासलेल्या तसेच मानसीक दृष्टया असंतुलीत महिलांच्या सामाजिक,मानसशास्त्रीय कायदेशीर समुपदेशन देणे व मदत करणे.
- महिला आयोगामार्फत मंजुर झालेल्या समुपदेशक केद्गांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

योजनेच्या अटी :-

- समुपदेशकाचे व सल्लागाराचे मानधन जास्तीत जास्त साधारणपणे दरमहा रु. ६,०००/- पर्यत असावे.
- कार्यालयीन / प्रशासकिय आवर्ती मासीक खर्चासाठी दरमहा रु. १५०/- राहिल.
- महिला आयोगामार्फत मंजुर झालेल्या समुपदेशक केंद्रांना जर शासनाकडुन अनुदान मिळत असेल तर त्यांना हे अनुदान देय राहणार नाही.
- समुपदेशक व सल्लागाराची निवड मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील, सीनीयर जे. एफ.एम.पी. (ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट) या समिती मार्फत करण्यात येईल.

**महिलाना व्यक्तिगत व्यावसायीक अनुदान**

फायद्याचे स्वरुप :- आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील महिलांना खाद्यपदार्थ तयार करुन विकणे, भाजीपाला व फळे विकणे इ. व्यवसाय करण्यासाठी मदत म्हणुन रु. ५००/- इतके अनुदान मंजुर करण्यात येते.

पात्रतेच्या अटी :-

- लाभधारक महिलेचे महाराष्ट्रातील वास्तव्य १५ वर्षापेक्षा कमी नसावे.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. ३२०००/- पर्यंत असावे. तहसीलदार / तलाठी यांचा उत्पन्नाचा दाखला.
- लाभधारकास या योजनेखालील अनुदान तिच्या हयातीत फक्त एकदाच अनुज्ञेय राहील.
- या योजनेतील अनुदान निराधार, परिव्यक्ता, विधवा नैतीक संकटात सापडलेल्या महिलानाही अनुज्ञेय राहील. मात्र त्यासाठी वरील अट क्रमांक २ ची पुर्तता होणे आवश्यक राहील.
- या योजनेच्या संदर्भात तहसिलदार, खासदार, आमदार, नगरसेवक, विशेष कार्य अधिकारी तथा ग्रामपंचायतीचा सरपंच यांनी प्रमाणीत केलेला उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.

**अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे**

- अगंणवाडींना आवश्यक असलेल्या साहित्याची बा.वि.प्र.अ. ए.बा.वि.से.यो. प्रकल्प यांचे कडून मागणी घेतल्या जाते व महिला व बाल कल्याण समितीची मंजुरी घेतल्या जाते.
- सदर साहित्य दर करारानुसार किंवा दर करार उपलब्ध नसल्यास जाहिर निविदा मागवुन खरेदी करण्यात येते.

**दहावी व बारावी पास मुलींना (MS-CIT) प्रशिक्षण देणे**

फायद्याचे स्वरुप :-

- आधुनिक युगात अत्यावश्यक असलेल्या संगणकाचे ज्ञान अवगत होते.
- १२ वी पास असल्याने शासकिय वा निमशासकिय संस्थेत काम करण्याची संधी उपलब्ध होवु शकते.

पात्रतेच्या अटी :-

- प्रशिक्षण पुर्ण केलेल्या लाभार्थ्यांना ९०% अनुदान व १०% लाभार्थी हिस्सा राहील.
- प्रशिक्षण समाधानकारक पुर्ण केल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- लाभार्थी कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.३२०००/- पर्यंत असावे. तहसीलदार / तलाठी यांचा उत्पन्नाचा दाखला.
- प्रशिक्षणार्थी ग्रामीण भागातील १० वी १२ वी पास असलेल्या मुलगी / महीला असावी.
- शासन मान्यता प्राप्त संस्थेमार्फत प्रशिक्षण घेणा-यांना लाभ देण्यात येईल.
- १०% लाभार्थी हिस्सा वगळुन ९०% अनुदान लाभार्थीस देण्यात येईल.
- चालु आर्थिक वर्षात अभ्यासक्रम पुर्ण केलेल्यांना योजनेचा लाभ देण्यात येईल

**निराश्रीत विधवांच्या मुलींसाठी विवाह अनुदान.**

फायद्याचे स्वरुप :- मुलीच्या लग्नासाठी रु. २०००/- अनुदान

पात्रतेच्या अटी :-

- लाभधारक महिला व तिच्या मुलीचे महाराष्ट्रातील वास्तव्य १५ वर्षा पेक्षा कमी नसावे.
- लाभधारक महिलेच्या कुटूंबाचे वार्षीक उत्पन्न रु.३२०००/- पेक्षा जास्त नसावे.

- मुलीच्या वयाबाबत शाळा सोडण्याचे प्रमाणपत्राचा दाखला, जन्माचा स्थानिक प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला किंवा डाक्टरचे वयाबाबतचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.
- विवाहाचे वेळेस मुलीचे वय १८ वर्षापेक्षा कमी असु नये .
- या योजनेखालील अनुदान फक्त एकाच मुलीच्या विवाहासाठी अनुज्ञेय राहील.
- मुलीच्या विवाहानंतर ९० दिवसापर्यत करण्यात आलेले अर्ज पात्र समजण्यात येईल.
- या योजनेच्या संदर्भात तहसिलदार, तलाठी, ग्रामपंचायतीचा सरपंच यांनी प्रमाणीत केलेला उत्पन्नाचा दाखला ग्राहय धरण्यात येईल .
- लाभधारक महिलेने पतिच्या निधनाबाबतचा संबंधित स्थानिक प्राधिका-यांचा दाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.
- मुलींचा विवाह नोंदणी झाल्याबाबतचा संबंधित प्राधिकरणाचा विवाह नोंदणी दाखला अर्जासोबत सादर करावा.
- सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता देण्यात येणार नाही

सर्व योजनांकरिता संपर्क :-

- उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) जि.प. यवतमाळ.
- प्रकल्प अधिकारी ,ए.बा.वि.से.यो.

**जिवन कौशल्य (जेंडर) प्रशिक्षण देणे**

फायदयाचे स्वरुप - किशोरवयीन मुलींना व महीलांना जेंडर बाबत तसेच आरोग्य व कुटुंब नियोजनाबाबत प्रशिक्षण देणे.

पात्रतेच्या अटी - ग्रामीण भागातील मुली व महीला असावी.

**महीला मंडळांच्या प्रशिक्षण केंद्गास अनुदान देणे**

फायदयाचे स्वरुप -
महीला मंडळांना केवळ महीलांकरिता चालविलेल्या प्रशिक्षण केंद्रास अनुदान मंजुर करणे.

पात्रतेच्या अटी -

- महीला मंडळ प्रशिक्षण केंद्र तालुक्याच्या टिकाणी असावे.
- संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९९५० आणि भारतीय संस्था अधिनियम १८९० खाली नोंदणी झालेले असावे.

- या योजनेखाली अनुदानाची मागणी करण्यापुर्वी मंडळ किमान दोन वर्षे महीला  कल्याण क्षेत्रात कार्य करित असले पाहीजे.
- प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणसाठी प्रशिक्षण वर्ग चालविण्याचा शासनाच्या संबंधित  प्राधिकरणाचा परवाना आवश्कय आहे.
- प्रशिक्षण वर्गातील महीलांच्या कुटुंबाचे उत्पन्न रु.३२०००/- पेक्षा जास्त नसावे.

# महिला व बालकल्याण विभाग

## यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत महिला व बालकल्याण विभागामार्फत सन २०१२-२०१३ मध्ये राबविलेल्या योजनांची माहिती.

| अनं | योजनेचे नांव व शिर्षक | प्राप्त अनुदान | प्रत्यक्ष खर्च | बाब | लाभार्थी उददीष्ट | लाभार्थी साध्य | शेरा | योजनेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प.सेस | २१५८२०० | २१५८२०० | १)अंगणवाडी करिता वजनकाटे पुरविणे | १६३५ अं.के | १६३५ अं.के | ----- | १)बा.वि.प्र.अ. यांचे मागणीनुसार दरकराराने साहीत्य खरेदी करणे |
| | | २०००० | ----- | २)पदाधिकाऱ्यांचा अभ्यास दौरा | ----- | ----- | ----- | २) पदाधिकारी यांचा अभ्यास दौ-यासाठी |
| | | १००० | ----- | ३) ५ वी ते १० मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत लेडिज सायकल पुरविणे | ----- | ----- | ----- | ३)ग्रामीण भागातील मुलींना मोफत सायकल पुरविणे |
| | | १००० | ----- | ४) शिलाई मशिन पुरविणे | ----- | ----- | ----- | ४) ग्रामीण भागातील महीलांना मोफत शिलाई मशिन पुरविणे |
| | | ३१०००० | ३०७००० | ५) महीला समुपदेशन केंद्र चालविणेसाठी अर्थसहाय्य | ४ समु.केंद्र | ४ समु.केंद्र | ----- | ५) कौटुंबिक हिंसाचार,लैगिक छळ यांने पिडीत महीलांचे सामाजिक व कायदेशिर समुपदेशन करणे |
| | | २००००० | १९९०८० | ६) १२ वी पास मुलींना - प्रशिक्षण | ७९ | ७९ | ----- | ६) ग्रामीण भागातील १० वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण |
| | | २७६०००० | २७५९९१० | ७) मुलींना व महीलांना जिवन कौशल्याचे () प्रशिक्षण | ४९०० लाभार्थी | ४९०० लाभार्थी | ----- | ७) ग्रामीण भागातील मुली व महींलांना जेंडर व कुटुंबनियोजना बाबत प्रशिक्षण |
| | | | | ८) महीला मेळाव्याचे आयोजन | १ तालुका | १ तालुका | ----- | ८) महीलांकरिता मेळाव्याचे आयोजन |
| एकुण | | ५४६०२०० | ५४३४१९० | | | | | |

महिला व बालकल्याण विभाग

यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत महिला व बालकल्याण विभागामार्फत सन २०१२-२०१३ मध्ये राबविलेल्या योजनांची माहिती.

| अनं | योजनेचे नांव व शिर्षक | प्राप्त अनुदान | प्रत्यक्ष खर्च | बाब | लाभार्थी | | शेरा | योजनेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | उददीष्ट | साध्य | | |
| १ | आदिवासी योजना | ८०००००/-<br>६०००००/- | ७९९५९८/-<br>----- | १. अंणवाडीला दरपंजी पुरविणे<br>२. महीलांना / मुलींना व्यावसायिक तांत्रिक प्रशिक्षण देणे | ५४१ अं. केंद्र<br>----- | ५४१ अं. केंद्र<br>----- | ३०/०३/१३ ला निधी प्राप्त झाल्याने अखर्चित. पुढील आर्थिक वर्षात खचर् करण्यात येईल. | १) बा.वि.प्र.अ. यांचे मागणीनुसार दरकाराराने साहीत्य खरेदी करणे<br>२) ग्रामीण महीलांना/मुलींना व्यावसायिक तांत्रिक प्रशिक्षण देणे |
| एकुण | | १४०००००/- | ७९९५९८/- | | | | | |
| ३ | ओटीएसपी उपयोजना | ४७०४४९/-<br>३२९५५१/-<br>६०००००/- | ४७०४४९/-<br>३२९५५१/-<br>----- | १) अंणवाडीला दरपंजी पुरविणे<br>२) महीलांना जेंडर प्रशिक्षण देणे<br>३) महीलांना / मुलींना व्यावसायिक तांत्रिक प्रशिक्षण देणे | ३१८अं. केंद्र<br>७००<br>लाभार्थी<br>----- | ३१८अं. केंद्र<br>७००<br>लाभार्थी<br>---- | ३०/०३/१३ ला निधी प्राप्त झाल्याने अखर्चित. पुढील आर्थिक वर्षात खचर् करण्यात येईल. | १)बा.वि.प्र.अ. यांचे मागणीनुसार दरकाराराने साहीत्य खरेदी करणे<br>२) ग्रामीण भागातील मुली व महींलांना जेंडर,कुटुंबनियोजनाबाबत प्रशिक्षण<br>३) ग्रामीण महीलांना/मुलींना व्यावसायिक तांत्रिक प्रशिक्षण देणे |
| एकुण | | १४०००००/- | ७९८०७७/- | | | | | |
| ५ | अनु. जाती | ८४०००००/- | ८३९५०४/- | अंणवाडीला दरपंजी पुरविणे | ५६८ अं.केंद्र | ५६८ अं. | | बा.वि.प्र.अ. यांचे मागणीनुसार |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | केंद्र | | दरकाराने साहीत्य खरेदी करणे |
| एकुण | | ८४०००००/- | ८३९५०४/- | | | | | |

ाहिला व बालकल्याण विभाग

यवतमाळ जिल्हा परिषद अंतर्गत हस्तांतरीत योजना सन २०१२-२०१३ मध्ये राबविलेल्या योजनांची माहिती.

| अनं | योजनेचे नांव व शिर्षक | प्राप्त अनुदान | प्रत्यक्ष खर्च | बाब | लाभार्थी | | शेरा | योजनेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | उददीष्ट | साध्य | | |
| १ | विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहा करीता विवाह भत्ता. | ३०००० | २२००० | विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहा करीता विवाह भत्ता. | १५ | ११ | ११ लाभार्थी प्रती लाभार्थी रु.२०००/- प्रमाणे (एकुण १६ अर्ज प्राप्त झाले त्यापैकी ५ | विधवा महिलांच्या मुलीच्या लग्नासाठी रु. २०००/- अनुदान |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | अपात्र) | |
| २ | महिला मंडळांना अनूदान. | ३६५००० | ७७९०० | आयुक्तालयाकडुन मंजुर महीला मंडळ केद्गास अनुदान | २ म.मंडळे | २ म.मंडळे | | २ महीलामंडळाच्या प्रत्येकी २ सत्राकरिता अनुदान<br>अ) ग्रामीण विविध कल्याणकारी संस्था द्वारा संचलित महीला शिवणकला प्रशक्षण कैंद्ग आर्णि<br>ब) प्रज्ञाशिल बहुउद्वेशिय संस्था नागपुर द्वारा संचलित महीला हस्तकला प्रशिक्षण कैंद्ग आर्णि |
| ३ | विद्यावेतन. (विघयो) | २५०० | १४५०० | | २२ | १८ | १७ लाभार्थीकरिता रु.१००/- प्रती महा प्रमाणे ८ महीन्याकरिता व १ लाभार्थीकरिता रु.१००/- प्रती महा प्रमाणे ९ महीन्याकरिता (एकुण ४५ अर्ज प्राप्त पैकी २८ अपात्र ) | आर्थिक दृष्टया मागास कुटूंबातील इयत्ता १० वी पास स्वतःचे पूर्नवसन करण्यासाठी दरमहा १००/- रु. विद्यावेतन शासनमान्य संस्थातुन उदा.पॅर्कीग, टेलीफोन ऑपरेटर ,टंखलेखन संगणक प्रशिक्षण ,नर्सीग ,आय.टी.आय. मध्ये प्रशिक्षण देणे |

## कुपोषण मुक्त ग्राम अभियान सन २०१३-२०१४

महाराष्ट्र राज्यातील ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांचे कुपोषण दर कमी करण्यासाठी राजमाता जिजाऊ पोषण व आरोग्य अभियान,राष्ट्रीय बाल दिन ,दिनांक १४/११/२०१२ ते जागतीक आरोग्य दिन,दिनांक ०७/०४/२०१३ या कालावधीत राबविण्याचा निर्णय महिला व बाल विकास विभाग यांचे शासन निर्णय क्रंमाक एबावि/२०१२/प्र.क्र.४२७/कार्यासन-५/मत्रांलय मुंबई,दिनांक ,०३/११/२०११ नुसार घेण्यात आला आहे.

सदर अभियानाचे उदिष्ट ० त ६ वर्ष वयोगटातील सर्व बालके साधारण श्रेणी आणने हे आहे.यवतमाळ जिल्हयात उपरोक्त कालावधीत सदर अभियाना अंतर्गत कुपोषण मुक्ती साठी खालील प्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.

०१) जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन.
०२) तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन.
०३) प्राथमीक आरोग्य स्तरावर कार्यशाळेचे आयोजन.
०४) ग्रामसभेचे आयोजन.
०५) किशोर वयीन मुले/मुली यांचे मार्फत मशाल फेरी.
०६) किशोर वयीन मुले/मुली यांचे समुपदेशन.
०७) नवविवाहीतांचे समुपदेशन
०८) गर्भवती मातांची तपासणी व समुपदेशन.
०९) लोह गोळया ,जंत नाशन व जिवन सत्व अ दिवस साजरा केला.
१०) स्तनदा माता समुपदेशन/स्तनपान विषयक चर्चा .
११) बालकांचा आहार,वैयक्तीक स्वच्छता व लसीकरण या विषयांवर मातांचे समुपदेशन.
१२) आहार व आरोग्य प्रदर्शनीचे आयोजन.
१३) परसबाग व बालकांची आरोग्य तपासणी या बाबत महिलांचे समुपदेशन.
१४) अंतर्गत कुपोषण मुक्त गाण्याची  व स्लोगन,दशपदी पत्रके तयार करण्यात आले.
१५) लोकसहभाग घेण्यात आला.




लुकडे साधारण बुटके बुटके व लठ्ठ







# राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त ग्राम अभियान

'एक पाऊल पुढे, सुदृढ-निरोगी महाराष्ट्राकडे'



- मातेचे चिकाचे दूध जन्मानंतर एका तासात बाळाला पाजणे.
- जन्मानंतर ६ महिन्यांपर्यंत फक्त आईचे दूध बाळाला पाजणे.
- ६ महिने झाल्यावर आईच्या दुधासह पूरक आहार सुरु करणे.
- पोषण आहारामध्ये सर्व मुख्य आणि सुक्ष्म तत्वे उपलब्ध असणे.
- पोषण आहाराची वारंवारिता ६ ते ८ वेळा ठेवणे.
- रक्तातील लोहाचे प्रमाण वाढविण्यासाठी गोळी किंवा स्प्रिंकल देणे.
- मूल पूर्ण ९ महिन्यांचे झाल्यावर दर ६ महिन्यांनी 'अ' जीवनसत्व देणे.
- आयोडिनयुक्त मीठाचे सेवन करणे.
- बाळाचे सर्व लसीकरण करणे.
- बाळाचे व अन्य व्यक्तींच्या विष्ठेची योग्य विल्हेवाट जोपर्यंत होत नाही असे वाटल्यास तोपर्यंत...
  - ६ ते २४ महिने बाळाला उकळून थंड केलेले पाणी पाजणे.
  - दर ६ महिन्यांनी जंतुनाशक औषध देणे.
  - हात साबणाने धुवून बाळास पाणी/औषध पाजणे किंवा भरविणे.

**जशी विवाह बंधनाची सप्तपदी तशी कुपोषणमुक्तीसाठी दशपदी**